**तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : desk२a@dte.org.in Internet :http/www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : २अ/एडीएम/२०१६/ २३
दिनांक : 6 JAN 2016

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक/ औरंगाबाद / नागपूर / अमरावती

विषय : पदवी आणि पदव्युत्तर तंत्रशिक्षण अभ्यासक्रम राबविणा-या संस्थांमध्ये विद्यार्थी आणि पालकांच्या तक्रारी निवारण करण्यासाठी तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याबाबत...

संदर्भ : १) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली यांनी प्रसिध्द केलेली पब्लिक नोटीस PG/०७(०४)/२०१५
२) केंद्र शासनाने दिनांक २५.५.२०१२ रोजी प्रसिध्द केलेले राजपत्र
३) संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०१५/१९१२, दिनांक ३.१२.२०१५

उपरोक्त विषयाबाबत संचालनालयाच्या संदर्भाधीन क्रमांक ३ च्या पत्रान्वये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारीत येणा-या सर्व व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या तक्रार निवारणासाठी प्रत्येक संस्थेमध्ये तक्रार निवारण कक्ष स्थापन करणे अनिवार्य आहे. तसेच या संस्थांमधील तक्रार निवारण कक्षाकडून तक्रारींचे निवारण न झाल्यास विद्यार्थ्यांना संस्था ज्या विद्यापीठाच्या अधिकक्षेत येत असेल त्या विद्यापिठाने नियुक्त केलेल्या लोकपाल, तक्रार निवारण कक्षाकडे करण्याची तरतूद आहे ही बाब कळविली होती. तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली यांनी सदर बाबीबाबत संदर्भाधीन क्रमांक १ अन्वये प्रसिध्द केलेली पब्लिक नोटीस आधारे तांत्रिक संस्थेत प्रवेश व शिक्षण घेताना उद्भवणा-या तक्रारींचे संस्थास्तरावर तदनंतर विद्यापीठ स्तरावर निवारण होण्यासाठी केंद्र शासनाने राजपत्रात दिनांक २५.५.२०१२ रोजी प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेचा संदर्भ उध्दत करून संस्थास्तरावर आणि विद्यापीठस्तरावर तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याचे सूचित केले आहे. त्यानुसार आपल्या अधिनस्त असलेल्या संस्थांमध्ये तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यास कळविण्याबाबत संदर्भाधीन पत्रान्वये सूचित केलेले होते व संस्थांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करण्यास कळविलेले आहे.

तसेच राज्यातील सर्व विद्यापीठांना संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०१५/१९१०, दिनांक ३.१२.२०१५ अन्वये विद्यापीठ स्तरावर तक्रार निवारण कक्ष स्थापन करून त्यांचे प्रमुख म्हणून लोकपाल (आम्बड्समन ) यांची नियुकती करावी व त्यांचेमार्फत विद्यार्थी - पालकांच्या तक्रारीचे निवारण करावे अशी विनियमात तरतूद असून त्यानुसार आपल्या विद्यापीठ स्तरावर कार्यवाही करण्याची विनंती संचालनलायाने केलेली होती व त्या पत्राची प्रतही आपल्या कार्यालयास पाठविण्यात आलेली आहे.

या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या अधिनस्त संस्थांमध्ये वरीलप्रमाणे कार्यवाही केली गेली असून तक्रार निवारण कक्ष स्थापन केला आहे किंवा कसे याची संस्थानिहाय माहिती एकत्रितरित्या खालील विवरण पत्रात संचालनालयास सादर करावी. तसेच आपल्या विभागामध्ये येणा-या विद्यापीठांकडे तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला आहे किंवा कसे आणि त्यानुसार लोकपाल

शिक्षण
11/1

सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती
क्रमांक 178 दिनांक 13/1/16

(आम्बड्समन ) यांची नियुक्ती झालेली आहे किंवा कसे याची विस्तृत माहिती उपलब्ध करून खालील विवरणपत्रात ती माहिती दिनांक ३०.१.२०१६ पर्यंत संचालनालयास सादर करावी.

संस्थांची माहिती खालील विवरणपत्रात सादर करावी

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पत्ता (डीटीई कोड क्रमांकासह) | अभ्यासक्रम (पदवी,पदव्युत्तर पदवी , ) | तक्रार निवारण कक्ष स्थापन केल्याच्या कार्यालयीन आदेशाचा क्रमांक व दिनांक | तक्रार निवारण कक्षाच्या प्रमुखाचे व समिती सदस्यांची नावे , पद ,दुरध्वनी क्रमांक व संपर्कासाठी ई मेल आय डी |
|---|---|---|---|---|
| | | | | |

विद्यापीठांची माहिती खालील विवरणपत्रात सादर करावी.

| Sr.No. | Name of the University | Ombudsman's Name | Adress for correspondence | Contact Number and e-mail |
|---|---|---|---|---|
| | | | | |

तरी,उपरोक्त नुसार आवश्यक ती माहिती संस्था तसेच विद्यापीठांकडून उपलब्ध करून घ्यावी व ती त्वरीत संचालनालयास सादर करण्यात यावी.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई

---

क्रमांक:-विकाअ/शिक्षण/निवारण कक्ष/२०१६/133
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 16 JAN 2016

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :-
१) मा. कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापिठ, अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता.
२) सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित, पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था यांना कळविण्यात येते की, वरील पत्राच्या अनुषंगाने दिलेल्या विवरणपत्रा माहिती भरुन दिनांक २२/१/२०१६ पर्यंत या कार्यालयास सादर करावी.
३) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.